# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ४५५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—२९/०७/२०१६.

**१) महीलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २८/०७/२०१६ चे १०.०० वा. दर. यातील फिर्यादी ही आपल्या घरी सासु सोबत घरी हजर असतांनी यातील आरोपी हा गावातुन दारु पिऊन घरी आला व काही कारण नसतांनी ''तुझ्या बापाचा घर आहे का घरुन निघुन जा'' असे बोलुन आरोपीने तिला अश्लिल शब्दात बोलुन मागेहुन येवुन तिचा विनयभंग करुन जिवाने मारण्याची धमकी दिली. असे फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी येथे कलम ३५४(अ)(४),५०६ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. नंदेश्वर पो.स्टे. करडी हे करीत आहेत.

**२) मोटार सायकलच्या धडकेने, इसमाचा मृत्यु . :—**

दिनांक ०१/०७/२०१६ रोजी २१.०० वा. दर. यातील मृतक वनवास झिटुजी मदनकर वय ४७ वर्ष, रा. पेट्रोल पंप ठाणा हा दि. ०१/०७/२०१६ ला रात्री जेवन करुन रोडने फिरत असता यातील अज्ञात आरोपी मोटार सायकलने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, लापरवाहीने चालवुन मृतकला पेट्रोल पंप ठाणा येथे धडक मारुन जखमी केला व पळुन गेला मृतकचे डोक्यास मारलागल्याने त्यास औषधौपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावला. पो. स्टे. अजनी नागपुर येथे मर्ग क्र. १७४ जाफौ. चे कागदपत्रा वरुन सरतर्फे फिर्यादी सफौ.कांबळे पोस्टे जवाहरनगर यांचे रिपोर्ट वरुन येथे कलम २७९, ३०४(अ) भादंवि सहकलम १८४,१३४ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. पाटील पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**३) काठीने डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २८/०७/२०१६ रोजी १५.०० वा. दर. फिर्यादी आभाजी कुंजीलाल पटले वय ६६ वर्ष, रा. मासलमेटा व आरोपी यांची शेती जवळजवळ असुन आरोपीतांनी फिर्यादीने धुरा तासल्याने जखमी मुलगा दिलावर आभाजी पटले वय ३६ वर्ष, यांनी त्याला हटकले वरुन तिन्ही आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीचे मुलास लाथाबुक्यांनी मारुन व आरोपी क्र.१ ने काठीने डोक्यावर मारुन जखमी केले असे फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२४,३२३,३४भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. रामटेके पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

### ४) शेतीच्या कारणावरुन शिविगाळ व जिवाने मारण्याची धमकी दिली . :—

दिनांक २८/०७/२०१६ रोजी १५.३० वा. दरम्यान फिर्यादी सौ. ममता महेश पटले वय ३४ वर्ष, रा. मासलमेटा ही शेतावर हजर असतांना यातील आरोपीने तुझ्या पतीने धुरा तासला असे बोलुन शिविगाळ करीत असता फिर्यादीने त्यास हटकले असता तिचे अंगावर जावुन कपडे फाडुन दोन्ही हात पकडुन थापडबुक्यांनी मारहान करुन तिचा विनयभंग केला. व शिविगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने व फिर्यादीचा भासरा अशोक पटले हा भांडण सोडवण्यास आला असता त्यास काठीने कमरेवर मारुन जखमी केले. असे फिर्यादी तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३५४,३२३,५०४,५०६भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. थेर पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

### ५) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—

दिनांक २९/०७/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक करणा—यावर ०३ केसस, तिन सिटर वाहनांवरती ०६ केसेस व इतर वाहनांवरती १०९ केसेस करण्यात आलेल्या आहे

( श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.